	जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर Email-cp.thane.pro@mahapolice.gov.in	
	'' प्रेस नोट''	**दिनांक : ०६/११/२०२६**

''गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे ची कामगिरी''

----------oooo----------

'' ०४ देशी बनावटीचे पिस्टल व ४९ जिवंत काडतुसे , ०१ देशी बनावटीचा कटटा व ०७ जिवंत काडतुसे असे रूपये ९,१९,१००/- किंमतीचे अग्निशस्त्र जप्त करून पाच आरोपीना अटक केलेबाबत ''

----------ooooo----------

गुन्हे शाखा, घटक-१ ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक / अनिल शिंदे यांना दि. ०२/११/२०२६ रोजी त्यांच्या बातमीदारामार्फत मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोलीस पथक नेमून **नाशिक ठाणे हायवे लगत साकेत कडे जाणारे साकेत सर्व्हीस रोडवर , ठाणे महानगरपालिका पाण्याचे टाकीच्या समोर** राबोडी ठाणे येथे सापळा रचुन रू. **९,१९,१००/-** किंमतीचे ०४ देशी बनावटीचे पिस्टल व ४९ जिवंत काडतुसे ,व ०१ देशी बनावटीचा कटटा व ०७ जिवंत काडतुसे असे विना परवाना आपले कब्जात बाळगुन सशस्त्र दरोडा टाकण्याच्या उद्देशाने वरील किंमतीची अग्निशस्त्रे बाळगली असतांना आरोपीत **१)** रितीक शशिकांत तिवारी उर्फ राहुल, वय २५ वर्षे, धंदा- चालक, राह. म.पो. हुरगांव, तालुका जिल्हा गडवा, राज्य झारखंड, मुळ राह. गांव रेडमा ,पोस्ट चियाकी, ता. जिल पलामु राज्य झारखंड व **२)** शुभम सुनिल तिवारी, वय २४ वर्षे, धंदा-शिक्षण, राह..स्वत:चे घर ,वॉर्ड नं. ५, पटेल पारा, पो. हरीहरपुर, ता. छत्तरपुर, जिल्हा सरभुजा, राज्य छत्तीसगड , **३)** कार्तिक कुमार विनोद चौधरी ,वय २३ वर्षे, धंदा शिक्षण, राह, गांव हुरमध्यया ,शिवमंदिराजवळ, ता.जि.गढवा, राज्य झारखंड , **४)** मृत्युंजय कुमार प्रदिप चौबे, वय २६ वर्षे, धंदा चालक, स्वत:चे घर, वॉर्ड नं. ८, मु.पो.ता. हुर, जिल्हा गढवा, राज्य झारखंड, **५)** ब्रिजकिशोर नन्हकु तिवारी, वय ५४ वर्षे ,धंदा शेती, मु.पो. तोलरा, ता. विश्रामपुर, जिल्हा पलामु, राज्य झारखंड , यांना सापळा करवाई दरम्यान ताब्यात घेवून त्यांच्याकडून रू. **९,१९,१००/-** किंमतीचा माल हस्तगत करून त्याचे विरूध्द राबोडी पो.स्टे. येथे गु.र.क्र. ३०४/२०२६,भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१०(४), सह शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७(१), १३५ प्रमाणे प्रमाणे दि. ०३/११/२०२६ रोजी गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखा घटक १ चे पोलीस उप निरीक्षक सुभाष मोरे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. आशुतोष डुंबरे, मा. पोलीस सह आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, मा. पोलीस सह आयुक्त, (गुन्हे) पंजाबराव उगले, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, अमरसिंह जाधव, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध १, गुन्हे शाखा, ठाणे, शेखर बागडे यांच्या सुचनेप्रमाणे व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक १, ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे, पो.निरीक्षक अमोल वालझाडे, म.सहा.पो.निरीक्षक चित्रा चौधरी, पो.उप निरीक्षक प्रकाश शिरसाठ, पो.उप.निरीक्षक सुभाष मोरे, सहा.पो.उप.निरी. उज्वला कुबल, दयानंद नाईक, सुनील माने, पोहवा/ नागराज सोनकडे, अविनाश पाटील ,संदिप महाडिक, व्यंकट धायगोडे, शेखर तडवी, शब्बीर फरास, नंदकुमार पाटील, दिपक जाधव, गणेश बडगुजर, शशिकांत सावंत, मलीका बहीरम, दिपाली जाधव, पो.ना/ निशिकांत पाटील,पोशि/ धनंजय आहेर, मुकंद आव्हाड, अमोल ढावरे, प्रशांत लवटे, सागर सुरळकर यांनी केली आहे.